महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : ०२२-२६५८१०८३
Email : ciro@mahadiscom.in
Websitee : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

जा. क्र .: औसंवि/ब/ककनिस/६७ वी बैठक/ 02535 दिनांक : 23 JAN 2020

# परिपत्रक

**विषय:** म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ६७ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

******

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ६७ वी बैठक दि. ०३.०१.२०२० रोजी सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रे (पू), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी माध्यमिक शालांत परिक्षा व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण केल्यास, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून शिष्यवृत्ती देण्यात येते. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षापासून माध्यमिक शालांत परिक्षा व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण केलेल्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती रक्कमेत खालील प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| शिष्यवृत्ती | सद्यस्थितीत देण्यात येणारी शिष्यवृत्ती रक्कम (प्रतिमाह) | सुधारित शिष्यवृत्ती रक्कम (प्रतिमाह) (शैक्षणिक वर्ष-२०१८-१९) |
|---|---|---|
| माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण केलेल्या पाल्यांसाठी | रु. २००/- | रु. ५००/- |
| उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण केलेल्या पाल्यांसाठी | रु. ४००/- | रु. ८००/- |

(टिप : माध्यमिक शालांत परिक्षा (प्रपत्र -अ) उत्तिर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना देण्यात येणारी रोख पारितोषिक रक्कम पूर्वीप्रमाणेच रु. ५००/- असून, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.)

२. म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सदस्यांपैकी सेवानिवृत्त होणाऱ्या संघटना प्रतिनिधींचा सत्कार (शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह/भेट वस्तू) करण्यात येईल.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत सविनय सादर :**

१. संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्या., हॉंगकॉंग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
२. कार्यकारी संचालक (मासं), महावितरण/ महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

**प्रत सस्नेह सादर :**

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

- संदर्भीय परीपत्रक आपल्या कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या माहितीसाठी आपल्या पातळीवरुन देखील प्रसारीत करावे.

D:\old pc data backup\D\old d drive\mudhan\A T Kadam new\KKN Baithak\66 baithak karyavrutant\67 baithak.docx